॥ लाजून हासणे अन् हासून ते पहाणे ॥

गायकः पं. हृदयनाथ मंगेशकर
गीतः मंगेश पाडगांवकर
संगीतः श्रीनिवास खळे

लाजून हासणे, अन् हासून ते पहाणे?
मी ओळखून आहे, सारे तुझे बहाणे ॥ धृ. ॥

डोळ्यांत पापण्यांचा का सांग भार व्हावा?
मिटताच पापण्यांचा चंद्र ही दिसावा।
हे प्रश्ण जीवघेणे हरती जिथे शहाणे
मी ओळखून आहे, सारे तुझे बहाणे ॥ १ ॥

हाती धनुष्य ज्याच्या, त्याला कसे कळावे
हृदयात बाण ज्याच्या, त्यालाच दुःख ठावे।
तिरपा कटाक्ष थोडा आम्ही इथे दिवाणे
मी ओळखून आहे, सारे तुझे बहाणे ॥ २ ॥

जाता समोरुनी तू, उगवे टपोर तारा
देशातुनी फुलांच्या, आणी, सुगंध वारा।
रात्रीत चांदण्यांचे सुचते सुरेल गाणे
मी ओळखून आहे, सारे तुझे बहाणे ॥ ३ ॥